## महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील तरतुदी नुसार करावयाची चौकशी

महसूल मध्ये विविध प्रकरणात वेगवेगळया प्रकारची चौकशी करावी लागते काही प्रकरणात करणेत येणारी चौकशी ही थोडक्यात असते तर काही प्रकरणात या चौकशी चे स्वरूप विस्तृत असते महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील तरतुदी नुसार चौकशी खालील तीन प्रकारे करता येते.

1. **म.ज.म १९६६ चे कलम २३४ नुसार सविस्तर किंवा रीतसर चौकशी**
2. **म.ज.म १९६६ चे कलम २३६ नुसार संक्षिप्त चौकशी**
3. **म.ज.म १९६६ चे कलम २३८ नुसार सामान्य चौकशी**

## म.ज.म १९६६ चे कलम २३४ नुसार सविस्तर किंवा रीतसर चौकशी

- **वादी व प्रतिवादी यांचे लेखी म्हणणे मराठी मध्ये घ्यावे.**
- **साक्षीदाराचे जबाब नोंदवावेत व वाचून दाखवावेत.**
- **वादी व प्रतिवादी यांचे युक्तीवाद ऐकावेत किवा स्विकारावेत.**
- **जेव्हा कोणताही पुरावा हा इंग्रजी मध्ये दिला जाईल तेव्हा चौकशी करणारा अधिकारी कलम २३४(४) नुसार त्याचा मराठी मध्ये अनुवाद करावा व तो अनुवाद अभिलेखाचा भाग होईल.**
- **प्रत्येक जबाब समक्ष घेऊन त्याखाली चौकशी अधिकारी यांनी स्वतःची सही करावी व संबधित प्रकरण टप्याटप्याने पूर्ण करावे**

### सविस्तर किंवा रीतसर चौकशी कोणत्या प्रकरणात करावी ?

- ✓ **फौजदारी दंड संहिता कलम १४५**
- ✓ **कुळकायदा केस चालविताना**
- ✓ **म.ज.म. १९६६ चे कलम २४७ अपील केस इत्यादी**

## म.ज.म १९६६ चे कलम २३६  नुसार संक्षिप्त चौकशी

- ❖ वादी व प्रतिवादी यांचे लेखी म्हणणे मराठी मध्ये घ्यावे.
- ❖ साक्षीदाराचे जबाब नोंदवावेत व वाचून दाखवावेत.
- ❖ वादी व प्रतिवादी यांचे युक्तीवाद ऐकावेत किवा स्विकारावेत
- ❖ संक्षिप्त चौकशी मध्ये परिस्थिती ,वस्तुस्थिती ,पंचनामा इ पुरावे महत्वाचे मानले जातात.
- ❖ प्रत्येक जबाब समक्ष घेऊन त्याखाली चौकशी अधिकारी यांनी स्वतःची सही करावी व संबधित प्रकरण टप्याटप्याने पूर्ण करावे
- ❖ संक्षिप्त चौकशी चे रुपांतर चौकशी अधिकारी यांना योग्य वाटत असेल तर रीतसर चौकशी मध्ये करू शकतात व ते कायदेशीर आहे.

### संक्षिप्त चौकशी कोणत्या प्रकरणात करावी ?

- ✓ लेखन प्रमाद दुरुस्ती म.ज.म १९६६ कलम १५५
- ✓ हद्दीवरून रस्ता अधिकार म.ज.म १९६६ कलम १४३
- ✓ सीमा व चिन्हाचे नुकासान म.ज.म १९६६ कलम १४५
- ✓ पिकपाहणी केस
- ✓ कोर्ट वाटप दरखास्त चालविताना
- ✓ CRPC 107,109,110 नुसार करणेत येणारी चौकशी इत्यादी

# म.ज.म १९६६ चे कलम २३८ नुसार सामान्य चौकशी

❖ या कलमानुसार जी चौकशी रीतसर व संक्षिप्त प्रमाणे करणे आवश्यक नाही ती चौकशी म्हणजे सामान्य चौकशी.

❖ अर्जदाराचा जबाब नोंदवावेत व वाचून दाखवावेत.

❖ या चौकशी मध्ये परिस्थिती ,वस्तुस्थिती ,पंचनामा इ पुरावे महत्वाचे मानले जातात.

❖ प्रत्येक जबाब समक्ष घेऊन त्याखाली चौकशी अधिकारी यांनी स्वतःची सही करावी व संबधित प्रकरण टप्याटप्याने पूर्ण करावे.

❖ सामान्य चौकशी चे रुपांतर चौकशी अधिकारी यांना योग्य वाटत असेल तर रीतसर चौकशी मध्ये करू शकतात व ते कायदेशीर आहे.

## सामान्य चौकशी कोणत्या प्रकरणात करावी ?

✓ रेशनकार्ड विभक्त चौकशी

✓ अनधिकृत बिनशेती चौकशी

✓ अनधिकृत वाळू वाहतूक

✓ अतिक्रमण चौकशी

✓ विशेष सहाय्य योजना प्रकरणे

✓ विटभट्टी प्रकरणे

<u>महत्वाचे:-</u> म.ज.म.अधिनियम १९६६ चे कलम २३७ नुसार रीतसर किंवा संक्षिप्त चौकशी ही भारतीय दंड संहिता (१८६० चा ४५ ) कलमे १९३,२१९,२२८, च्या अर्थानुसार न्यायिक कार्यवाही समजावी व चौकशी करणाऱ्या कोणत्याही प्राधिका-याचे कार्यालय चौकशी कारणासाठी दिवाणी न्यायालय समजणेत यावे

संकलन:- मोहसिन शेख तलाठी कर्जत ९७६६३६६३६३